साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–रत्नमाला मधुकर झाडे
वय:– ३० वर्ष, व्यवसाय–शेती
राह.महालमाव, ता.भिवापुर, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. घटना दि.२६/०५/२०२२ रोजीची दुपारी १.०० वाजेची आहे. सदर दिवशी आमच्या खताच्या जाग्यावर आम्ही झोपडी बांधली होतो. त्यावेळी आरोपी मला म्हणाले की, सदर झोपडीची जागा आमची आहे. त्यावेळी मी व माझा लहाण पोरगा असे आम्ही फाटे ठोकत होतो. त्यावेळी नारायण भोयर, निखिल नारायण भोयर व आरोपी नारायण यांचा दुसरा मुलगा असे तेथे आले व त्यांनी माझे सिमेटाचे डेरी पाडले त्यामुळे मी खाली पडली व मी खाली पडली असता आरोपीने मला, माझ्या आईला व माझ्या मुलाला मारले. एका आरोपीने माझ्या आईला दांड्याने मारले व एका आरोपीने कु–हाडीने मारले. आरोपीने मला मारल्यामुळे माझ्या डोक्यावर टाके बसले होते. तसेच माझ्या मांडीला, पाटीला व डोक्याला मार लागला होता. त्यानंतर मी पो.स्टे.ला रिपोर्ट द्यायला गेली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.२२** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.२३** देण्यात आला. पोलिसांनी मला दवाखाण्यात नेले होते व डॉक्टरांनी मला तपासले होते. आता मला माझे वैद्यकिय प्रमाणपत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे सहीपुरता **निशानी क्र.२४** देण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी मला घटनास्थळावर नेले होते. तेथे पोलिसांनी लिखापडी करून फोटो काढले होते. घटनास्थळावर मी, पोलिस व पोलिस पाटील असे लोकं होते. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. आरोपीने मला ज्या वस्तुने मारले होते त्या वस्तु दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला जी.पी. नं.८४/२२ एक वेळवाची गोल काठी दाखविण्यात आली ती तीच आहे त्याला एम.ओ.०१ देण्यात आला. आता मला जी.पी. दुसरी चापट काठी दाखविण्यात आली ती ती काठी नाही जी पोलिसांनी जप्त केली होती. मी आरोपीला पाहील्यास ओळखते आरोपी न्यायालयात हजर नाही. आरोपीच्या गैरहजेरीचा

अर्ज नि.क्र.१८ वर मंजुर ओळखीबाबत तक्रार नाही.

<u>सरतपास संपला.</u>

<u>आरोपीतर्फे ॲड. आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>

२. मी पोलिसांना बयाण व रिपोर्ट देतेवेळेस असे सांगितले होते की,त्यावेळी मी व माझा लहान पोरगा फाटे ठोकत होतो, तसेच त्यांनी माझ्या सिमेंटच्या डेरी पाडल्या त्यामुळे मी खाली पडली, तसेच आरोपीने माझ्या आईला व मुलाला मारले, तसेच एका आरोपीने माझ्या आईला दांड्याने मारले व एका आरोपीने कु–हाडीने मारले, तसेच माझ्या डोक्यावर टाके लागले होते, तसेच माझ्या मांडीला व पाठीला मार लागला होता या बाबी मी सांगितल्या होत्या. आता मला माझी फिर्याद व बयाण दाखविण्यात आले त्यामध्ये सदर बाबी नमुद नाही त्या का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. पोलिसांना रिपोर्ट व बयाण दिल्यानंतर मी वाचुन पाहिले होते. सदर मजकुर माझ्या बयाण व फिर्यादमध्ये नमुद नसल्याबाबत मी उजर घेतला होता. मी उजर घेतल्याबाबत तसा दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेला नाही. साक्षीदार पुन्हा सांगते की, वरिल सर्व बाबी मी पोलिसांना सांगितल्या होत्या व त्यांनी रिपोर्ट व बयाणामध्ये लिहीलेल्या होत्या. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली त्यामध्ये वरिल बाबी लिहीलेल्या नाही. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद नि.क्र.२२ ही ति फिर्याद नाही.

३. मी माझ्या खताच्या खड्ड्याच्या जागेचे कागदपत्र पोलिसांना दिले होते. माझ्याकडे गाई ढोरे वासरे आहे. माझा खताचा खड्डा हा दोन माणुस खोल होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा खताचा खड्डा दोन फुट खोल असल्यामुळे त्याच्यावर झोपडी बांधता येत नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, खड्ड्याची जागा साफ केल्यानंतर झोपडे बांधता येते. साक्षीदार पुढे सांगते की, माझे आईबाबासोबत पटत नव्हते म्हणुन मी झोपडी बांधत होते. ग्रामपंचायतमधुन झोपडी बांधण्यासाठी मी परवानगी घेतली होती. ग्रामपंचायतने झोपडी बांधण्यासाठी मला लेखी परवानगी दिली होती. सदर लेखी परवानगी मी पोलिसांना दिली होती. आता मला अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये सदर लेखी परवानगी अभिलेखावर नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायतकडुन झोपडी बांधण्याची परवानगी घेतली नव्हती म्हणुन मी सदर दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही.

४. घटनेच्या वेळी माझे लग्न झालेले होते. लग्नानंर मी माझ्या माहेरी महालगाव येथे राहायला आली. मी माझ्या माहेरी राहत असतांना माझ्या आईसोबत माझे पटत नव्हते.

हे म्हणणे खरे नाही की, सदर झोपडी बांधण्याची परवानगी नसल्यामुळे मला आजुबाजुच्या लोकांनी झोपडी बांधण्यास मनाई केली होती. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीसोबत घटनेच्या पुर्वीपासुनच माझे पटत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की,बल्ल्या तुटल्यामुळे आम्ही खाली पडलो व मार लागला. हे म्हणणे खरे नाही की,मी बल्ल्या ठोकत असतांनी खाली पडले व मार लागला. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला कधीच मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी एम.ओ.०१ काठी आज पहिल्यांदाच न्यायालयात पाहत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी ज्या ठिकाणी झोपडे बांणणे चालु होते त्या ठिकाणाहुनच काठी घेतली होती. साक्षीदार स्वत:हुन सांगते की, पोलिसांनी तेथुन कु–हाड घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, खताची जागा आरोपीची होती व त्यावर मी झोपडे बांधत होती. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला झोपडे बांधण्यास मनाई केल्यामुळे मी खाटी केस आरोपीविरूध्द दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला मारहाण केली नाही व आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की,मी सांगितल्याप्रमाणे कोणतीच घटना घडलेली नाही.

<u>**फेरतपास काही नाही.**</u>

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि०३.०५.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड